CMYK

आंबिया बहार फळ पीक विमा योजना शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा >>पान 2

नक्षलवाद बीमोड करणे काळाची गरज >>पान 3

डॉ. ऋतुजा चव्हाण यांना वंचित ची उमेदवारी जाहीर >>पान 4

सुविचार

हसत राहिलात तर पूर्ण जग आपल्यासह आहे, नाही तर डोळ्यातील अश्रूंनाही डोळ्यामध्ये जागा मिळत नाही.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



११ वर्षांपूर्वी सलमान खान करणार होता 'लॉरेन्स' सोबत चित्रपट, पण अक्षय कुमारने मारली बाजी!

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 76 ■ मंगळवार, दि. 22 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## वंचित बहुजन आघाडीकडून १६ जागांसाठी उमेदवारांची यादी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र राज्य समितीने महाराष्ट्राच्या आगामी विधानसभेच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे १६ उमेदवार जाहीर केले आहेत. यामध्ये भुसावळ विधानसभा मतदार सघासाठी जगन देवराम सोनवणे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. तर मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी डॉ. ऋतुजा चव्हाण, मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघासाठी सुगत वाघमारे, रिसोड विधानसभा मतदारसंघासाठी प्रशांत सुधीर गोळे, ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघासाठी लोभसिंग गणपतराव राठोड, ऐरोली विधानसभा मतदारसंघासाठी विक्रांत दयानंद चिकणे, जोगेश्र्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघासाठी परमेश्र्वर रणशुर, दिंडोशी विधानसभा मतदारसंघासाठी राजेंद्र तानाजी ससाणे, मालाड विधानसभा मतदारसंघासाठी अजय आत्माराम रोकडे, अंधेरी पूर्व विधानसभा मतदार सघासाठी ॲड. संजीवकुमार कलकोरी, घाटकोपर पश्र्चिम विधानसभा मतदारसंघासाठी सागर रमेश गवई, घाटकोपर पूर्व विधानसभा मतदारसंघासाठी सुनिता गायकवाड, चेंबूर विधानसभा मतदारसंघासाठी आनंद भीमराव जाधव, बारामती विधानसभा मतदारसंघासाठी मंगलदास तुकाराम निकाळजे, श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघासाठी अण्णासाहेब शेलार, उदगीर विधानसभा मतदारसंघासाठी प्रा. डॉ. शिवाजीराव मरेप्पा देवनाळे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

## हा प्रक्रियेचा दुरुपयोग, हिंदुत्व शब्द बदलण्याची मागणी करणारी याचिका फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

**मुंबई/प्रतिनिधी :**सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सोमवारी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. हिंदुत्व हा शब्द बदलण्याची मागणी करणारी एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सोमवारी सुनावणी पार पडली. या याचिकेत 'हिंदुत्व' हा शब्द बदलण्याची मागणी करण्यात आली होती. ही याचिका डॉ.एस.एन. कुंद्रा यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी नाराजी व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी या याचिकेवरील सुनावणीवेळी महत्वाची टिप्पणी देखील केली. हिंदुत्व या शब्दाऐवजी भारतीय संविधान हा शब्द वापरण्याची मागणी करणारी याचिका डॉ. एस.एन. कुंद्रा यांनी दाखल केली होती. या याचिकेवर विचार करण्यास सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी नकार दिला.




# आज काँग्रेसची पहिली यादी येणार : पटोले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुका तोंडावर असताना राजकीय घडामोडींना वेग आला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आपली पहिली यादी जाहीर केली असून महाविकास आघाडीमध्ये जागावाटपासंदर्भात रस्सीखेच सुरूच आहे.

मुंबई व विदर्भातील अशा एकूण १७ जागांवरुन महाविकास आघाडीमध्ये निर्माण झालेला तिढा सोडवण्यासाठी दिल्लीमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत सोमवारी दि. २१ ऑक्टोबर रोजी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली आहे. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना नाना पटोलेंनी जागावाटपासंदर्भात महत्त्वाची माहिती दिली आहे.

दरम्यान यावेळी बोलताना ते म्हणाले, जवळपास ९६ जागांवर चर्चा झाली असून काही जागा उएउ मध्ये टाकणार आहेत व ज्या आघाडीतील जागांवर चर्चा सुरू आहे त्यासंदर्भात येत्या २४ तारखेला पुन्हा चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच काही जागांवर वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेऊन आज आम्ही पहिली यादी देऊ, असेही ते पुढे म्हणाले.



## विदर्भ हा काँग्रेसचा गड, बालेकिल्ल्यात जास्तीत जास्त जागा कायम ठेवण्यात आम्हाला यश; काँग्रेस नेते नितीन राऊतांचे वक्तव्य

**नागपूर/प्रतिनिधी :** महाविकास आघाडीच्या चर्चेत आता स्पीड ब्रेकर राहिले नाही. फक्त एक दिवस वातावतरण तापले होते, मात्र आता सर्व योग्य दिशेने सुरू आहे. किंबहुना शिवसेनेचा गड कोकण, मुंबई आहे. तसेच विदर्भ हा काँग्रेसचा गड आहे. आपल्या बालेकिल्ल्यात जास्तीत जास्त जागा घेण्याच्या दिशेने आम्ही काम करत आहोत. सरतेशेवटी शिवसेनेसोबत सामंजस्य होईल आणि विदर्भात काँग्रेस आपल्या जागा ठेवण्यात यशस्वी होईल.असे वक्तव्य काँग्रेसचे नेते नितीन राऊत यांनी बोलताना व्यक्त केले आहे.

## ठाकरे गटाकडून २८८ जागा स्वबळावर लढण्याची तयारी?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतरही महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाच्या मुद्यावरुन तिढा कायम आहे. शिवसेना ठाकरे गटासोबत काँग्रेस नेत्यांचे खटके उडाल्याची बातमी समोर आल्यानंतर काँग्रेस हायकमांडने राज्यातील नेत्यांसोबत दिल्लीत बैठक घेतली. काँग्रेस आणि ठाकरे गटातील वाद निवळण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तर, दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाने स्वबळावर २८८ जागांवर स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाची चर्चा सुरू असताना दुसरीकडे काही जागांवर वाद निर्माण झाला आहे. या वादांवर तोडगा काढण्याचे प्रयत्न तिन्ही पक्षांकडून सुरू आहे. तर, दुसरीकडे उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर बैठक बोलावली आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या सर्वच जागांसाठी शिवसेना ठाकरे गटाची तयारी पूर्ण झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जागावाटपावरून काँग्रेस सोबत वैचारिक मतभेद असल्यामुळे ठाकरे गटाचा प्लॅन अ आणि प्लॅन ँ तयार आहे. काँग्रेससोबत आले तर त्यांच्यासोबत निवडणूक लढवली जाणार. अन्यथा त्यांच्याशिवाय निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीला आक्रमकरित्या सामोरे जाण्याची ठाकरे गटाची रणनीती आखल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ठाकरे गटाच्या वादावर काँग्रेसची दिल्लीत चर्चा

राज्यातील काँग्रेसचे महत्त्वाचे नेते हे सध्या दिल्लीत आहेत. दिल्लीत काँग्रेस उमेदवारांची यादी निश्चित करण्यात येत आहे. तर, दुसरीकडे राज्यात जागा वाटपावरून शिवसेना ठाकरे गटासोबत सुरू असलेल्या वादावरही काँग्रेसमधील पक्षश्रेष्ठी आणि राज्यातील नेत्यांमध्ये चर्चा झाली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासोबतच्या बैठकीत शिवसेना ठाकरे गटाच्या आडमुठ्या भूमिकेवर प्रश्नच उपस्थित केले.

## ठाकरेंचा शिलेदार अजित पवारांच्या गटात, दादांनी बारामतीच्या उमेदवारीचा विषयच संपवला!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय पक्षांमध्ये इनकमिंग-आऊटगोईंग सुरू झाले आहे. तर, दुसरीकडे संभाव्य उमेदवारांबाबतही चर्चा सुरू झाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार हे शिरुर मधून की बारामती मधून निवडणूक लढवणार यावर चर्चा सुरू होती. आता या चर्चेला अजित पवार यांनी पूर्णविराम लावला आहे.

शिरुर विधानसभेची जागा जिंकण्यासाठी अजित पवार गटाने कंबर कसली आहे. विद्यमान आमदार अशोक पवार हे शरद पवार गटात आहेत. त्यांच्याविरोधात अजितदादा रिंगणात असणार असल्याची चर्चा होती. पण, आता अजित पवार यांनी अशोक पवारांविरोधात तगडा उमेदवार रिंगणात उतरवण्याचे निश्चित केले असल्याचे म्हटले जात आहे. उद्धव ठाकरे यांचे शिलेदार शिरूरचे शिवसेना नेते ज्ञानेश्वर (माऊली) आबा कटके यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. अजित पवार हे बारामतीमधूनच निवडणूक लढवणार आहेत. तर, शिरुरमधून ज्ञानेश्वर कटके रिंगणात असण्याची शक्यता आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर आबा कटके यांनी आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. बारामतीत अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांनी आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश केला. शिरूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक समन्वयक, पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.



पुणे जिल्ह्यातील शिरूर विधानसभा मतदारसंघ हा जिल्ह्यातील महत्त्वाचा विधानसभा मतदारसंघ मानला जातो. ज्ञानेश्वर आबा कटके यांचा प्रवेश हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी मोठा धक्का मानला जात आहे. महाविकास आघाडीत हा मतदारसंघ शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे असणार आहे. या ठिकाणाहून विद्यमान आमदार अशोक पवार यांना पुन्हा संधी मिळणार असल्याचे म्हटले जात आहे.

## आता लढणार, पाडणार, जिरवणार, युद्ध अटळ... मनोज जरांगेंनी सांगितलं कोणत्या जागा लढवणार

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** येत्या दोन दिवसात कुठल्या जागा लढणार आणि कुठल्या जागा पाडणार याबाबत निर्णय घेऊ आणि जाहीर करू अशी घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. राज्य सरकारला संधी दिली होती, मात्र त्यांनी संधीचा सोनं केलं नाही आता युद्ध अटळ असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. माझी निवडणूक लढण्याची इच्छा नव्हती मात्र समाजाची इच्छा होती त्यामुळे त्यांचं मला ऐकावं लागतं. आता, लढणार , पाडणार , जिरवणार अशी घोषणाच जरांगे पाटील यांनी दिली आहे.

## संभाजीराजेंच्या तिसऱ्या आघाडीचे ८ उमेदवार जाहीर, बच्चू कडू अचलपूरमधून; सांगलीत २ उमेदवार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून उमेदवारांची घोषणा होत आहे. भाजपने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून महायुतीमधील इतरही घटक पक्ष लवकरच यादी जाहीर करणार आहेत. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीने उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आघाडी घेतली असून ६६ उमेदवारांची घोषणा केली आहे. आता, यंदा उदयास आलेल्या तिसऱ्या आघाडीकडूनही उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी आणि आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील परिवर्तन आघाडीने आपल्या ८ उमेदवारांची नावे जाहीर केली असून स्वाभिमानीच्या २ उमेदवारांची नावे उद्या २२ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येणार आहेत. दरम्यान, परिवर्तन महाशक्तीकडून जाहीर करण्यात आलेल्या पहिल्या यादीत आमदार बच्चू कडू यांचं नाव असून बच्चू कडू यांना अचलपूर मतदारसंघातून प्रहारच्या चिन्हावर उमेदवारी जाहीर करण्यात आलीय.व्हिजन महाराष्ट्र म्हणून बाकीच्या राज्याने आदर्श घ्यावा असं कोणताही पायाभर आराखडा आपल्याकडे नाही, म्हणून परिवर्तन महाशक्तीची निर्मिती झाल्याचं आमदार बच्चू कडू यांनी म्हटलं. तसेच, परिवर्तन महाशक्ती आघाडीला चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या असून आज आम्ही महाशक्तीचे उमेदवार जाहीर करत असल्याचे सांगत आमदार बच्चू कडू यांनी स्वत:ची उमेदवारी जाहीर केली.

## गडचिरोलीतून मोठी बातमी, चकमकीत ४ माओवाद्यांचा खात्मा, जवानांची धडक कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिधी :** महाराष्ट्रामध्ये निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे. तर दुसरीकडे गडचिरोलीमध्ये पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. जवानांच्या धडक कारवाईत ४ माओवादी ठार झाले आहेत. या माओवाद्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. अचानक झालेल्या चकमकीत माओवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. जवानांनी चोख प्रत्युत्तर देत गोळीबार केला. या गोळीबात चार माओवादी ठार झाले आहे.

गेल्या तीन तासापासून गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगड सीमेवरील कोपरसीच्या जंगलात माओवाद विरोधी अभियानाचे सी ६० कमांडो आणि माओवादी यांच्यात चकमक सुरू झाली. या चकमकीत चार माओवाद्यांना ठार मारण्यात जवानांना यश मिळाला आहे. तर या चकमकीत एका जवानाच्या पायाला गोळ्या लागली आहे. जखमी असल्याने त्याला हेलिकॉप्टरने उपचारासाठी नागपूरला हलवण्यात आलं आहे. हा भाग अबूजमाडच्या जंगलाला लागून असून सॅटेलाईट फोनने जिल्हा मुख्यालयातून संपर्क साधण्यात यश आल्यानंतर ही माहिती पुढे आली आहे. जवानांच्या मदतीसाठी अतिरिक्त मदत पाठवण्यात आली असून माओवाद्यांचे मृतदेह घेऊन सुरक्षितपणे जवानांना मुख्यालयात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

# भाजपा उमेदवारांची यादी जाहीर होताच पहिली बंडखोरी?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठीच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर राज्यातील वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये नाराजीनाट्य पाहायला मिळू लागलं आहे. अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यामधील श्रीगोंदा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी म्हणून भाजपा नेत्या तथा भाजपा महिला आघाडीच्या आहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस सुवर्णा पाचपुते इच्छुक होत्या. त्यांनी मतदारसंघात मोर्चेबांधणी देखील केली होती. मात्र, पक्षाने त्यांच्याऐवजी प्रतिभा पुचपुते यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे सुवर्णा पाचपुते यांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. प्रसारमाध्यमांसमोर बोलताना त्यांना हुंदका आवरता आला नाही. तसेच त्यांनी भाजपावर टीका केली आहे. यासह सुवर्णा पाचपुते यांनी पक्षाला ताकद दाखवून देईन असा इशारा देखील दिला आहे.

## श्रीगोंद्यात सुवर्णा पाचपुतेंचा निर्धार, ''पक्षाला ताकद दाखवणार''

सुवर्ण पाचपुते म्हणाल्या, ''मला लोकांचा मोठा आधार मिळाला आहे. आज माझ्या डोळ्यात पाणी आलंय, पण ते खाली गळत नाही. कारण माझ्यामागे मोठा जनसमुदाय उभा आहे. लोकांचा मला पाठिंबा आहे. माझे लोक मला सांगतायत, ताई तुम्ही काहीही करा, परंतु, निवडणुकीला उभ्या राहा. त्यामुळे मी एक गोष्ट करणार आहे. माझी आणि पक्षाची विचारधारा सारखी आहे. त्यामुळे मी निवडणूक लढले तर अपक्ष लढेन. मी इतर कोणत्याही पक्षात जाणार नाही. मला केवळ माझ्या पक्षाला स्वत:ची ताकद दाखवून द्यायची आहे. कारण माझा पक्ष धृतराष्ट्रासारखा झाला आहे. त्यांना असं वाटतंय की महाभारत व्हायचं ते होऊ द्या, जनतेचं जे काही व्हायचं असेल ते होऊ द्या. आम्हाला केवळ आमची सत्ता आणायची आहे. जवळपास प्रत्येक पक्षाचं होच ध्येयधोरण आहे.

भाजपाकडून ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने रविवारी (२० ऑक्टोबर) उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत भाजपाने ९९ जागांवरील उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपाने देवेंद्र फडणवीस यांना नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून पुन्हा एकदा उमेदवारी दिली आहे. तर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. आशिष शेलार यांना वांद्रे पश्चिम, अतुल भातखळकर यांना कांदिवली पूर्व, राम कदम यांना घाटकोपर पश्चिम, मीहिर कोटेचा यांना मुलुंड, गणेश नाईक यांना ऐरोली, रवींद्र चव्हाण यांना डोंबिवली, चंद्रकांत पाटील यांना कोथरूड, तर, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना कुलाबा मतदारसंघातून संधी देण्यात आली आहे.



CMYK

## विषारी दारूचे बळी

बिहार मध्ये विषारी दारू पिऊन चाळीस पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली. विषारी दारू पिऊन मृत्युकांड घडल्याची ही देशातील पहिली वेळ नाही तर अशा अनेक घटना याआधी देशात घडल्या आहे. दरवर्षी अशी एखादी तरी घटना घडतेच. सहा महिन्यापूर्वीच तामिनाडूमध्ये अशी दुर्दैवी घटना घडली होती. मागील पूर्वी पंजाबमध्ये विषारी दारू पिऊन ९० लोकांचा बळी गेला होता. बिहार राज्यातील तर अशा अनेक घटना घडल्या आहेत. दोन वर्षापूर्वी बिहारमध्येच विषारी दारू पिऊन ३६ जणांना जीव गमवावा लागला होता. बिहार हे राज्य तर विषारी दारू साठीच प्रसिद्ध आहे की काय अशी शंका आता येऊ लागली आहे कारण विषारी दारूचे सर्वाधिक बळी हे बिहार राज्यातच गेले आहेत. ऑक्टोबर २०२२ मध्ये बिहार मध्येच विषारी दारू पिल्याने ७२ जण दगावले होते. मार्च २०२२ मध्ये १२ जण तर नोव्हेंबर २०२१ मध्ये ४२ जणांचा बळी गेला होता. आताही तिथेच पुन्हा ही दुर्दैवी घटना घडली आहे. मागील घेटनेतून कोणताही बोध न घेतल्यानेच अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होत आहे. विशेष म्हणजे बिहार राज्यात संपूर्ण दारू बंदी आहे. विषारी दारुकांडात ४० हून अधिक लोकांचा बळी गेल्यावर नेहमीप्रमाणे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यासाठी एस आय टी नेमून संपूर्ण घटनेची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची घोषणा त्यांनी केली पण यातून विशेष काही हाती लागेल असे वाटत नाही. एखादी दुर्दैवी घटना घडली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला की त्या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमणे ही आपल्या देशात नित्याची बाब आहे. पण त्या चौकशी आयोगाचे पुढे काय होते? त्यातून दोषींना शिक्षा होते का ? शिक्षा झाली तर मग अशा घटनांची पुनरावृत्ती का होते ? हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. मुळात अशा घटना घडूच नयेत यासाठी सरकार काय प्रयत्न करते हे महत्वाचे आहे. विषारी दारू उत्पादित करून ती विकली जात असताना बिहार सरकार आणि तेथील पोलीस यंत्रणा काय करत होती हा खरा प्रश्न आहे. दारूची निर्मिती करणारे दारुमध्ये अल्कोहोल, धतुरा आणि युरिया टाकत होते अशी माहिती समोर आली आहे. ही दारू बनवण्यासाठी नवसागर आणि मिथाईल अल्कोहोल यासारख्या रसायनांचा देखील वापर केला जातो. हे सर्व पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहेत. हे माहीत असतानाही त्याचा दारुसाठी सर्रास वापर केला जातो. आपल्या देशात विना परवाना दारू विक्री करणे हा गुन्हा असताना गाव खेड्यातच नव्हे तर शहरातही अवैध दारूच्या भट्ट्या जागोजागी दिसतात. या भट्ट्यांमध्ये अवैध पद्धतीने दारू उत्पादित केली जाते. हे पोलिसांसह प्रशासनाला देखील माहीत असते पण या दारू माफियांनी पोलिसांसह प्रशासनाचे देखील हात आधीच ओले केले असल्याने ते त्याकडे काणाडोळा करतात त्याचा परिणाम म्हणून अशा दुर्दैवी घटना घडतात. एखादी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्र्च हरिओम होतो. दारू माफिया व पोलीस प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कडक कारवाई होत नाही तोवर या घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने बिहार पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली मात्र ही अटक केवळ दिखाव्यापुरती आहे. छोट्या माशांना अटक करून बिहार पोलीस कारवाईचा दिखावा करत आहेत. मोठे मासे म्हणजे दारू माफियांना गजाआड करण्याचे धाडस बिहार पोलीस दाखवू शकत नाही. अर्थात दारू पिणारे लोक त्यांच्याकडे येतात म्हणूनच ते दारू विकतात हे ही तितकेच खरे आहे. दारूच्या आहारी गेलेले लोक दारू मिळाली नाही तर जी दारू मिळेल ती पितात. आपण जी दारू पितो तिच्यामुळे आपला जीवही जाऊ शकतो याचेही त्यांना भान नसते. दारू माफियांवर कारवाई करण्यासोबतच दारूच्या आहारी गेलेल्या लोकांचे समुपदेशन करून त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी देखील शासन स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.

# आंबिया बहार फळ पीक विमा योजना शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

पुनर्रचित हवामान आधारित 'फळ पीक विमा योजना' आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये डाळिंब, संत्रा, मोसंबी, काजू, केळी, द्राक्ष, आंबा, पपई व स्टॉबेरी या ९ फळपिकांसाठी ३० जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत–जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, यासाठी या योजनेची माहिती देणारा हा लेख

बिया बहार फळ पीक विमा योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी सहभाग ऐच्छिक आहे. योजनेत सहभागी होणेबाबत अथवा न होणेबाबत घोषणापत्र ज्या बँकेमध्ये पिककर्ज खाते/ किसान क्रेडिट कार्ड खाते आहे तिथे जमा करणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी न होण्याबाबत घोषणापत्र योजनेत सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या ७ दिवस अगोदर बँकेला देणे आवश्यक आहे. जेणेकरुन बँक विमा हप्ता परस्पर कपात करणार नाही. तसेच कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज घेतलेल्या अधिसूचित फळपिकांकरिता विहित नमुन्यातील घोषणापत्र संबंधित बँकेत सादर करणे आवश्यक राहिल. जे कर्जदार शेतकरी विहित मुदतीत सहभागी न होण्यासाठी बँकांना कळविणार नाहीत, असे शेतकरी योजनेत सहभागी आहेत असे गृहित धरण्यात येईल व या शेतकऱ्यांचा विमा हप्ता विहित पद्धतीने कर्ज खात्यातून वजा करण्यात येईल.

अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित फळपिके घेणारे या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांस नोंदणीकृत भाडेकरार अनिवार्य आहे. या योजनेत राज्यात प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरीता एका फळपीकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हे) आणि उर्वरित विभागाकरीता कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हे.) अशी मर्यादा राहील. एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकासाठी मृग व आंबिया बहार मिळून जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत विमा नोंदणी करण्याची मुभा आहे. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागू राहणार आहे. त्यासाठी फळपिकांचे उत्पादनक्षम वय पुढीलप्रमाणे राहील. आंबा, चिकू, काजू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ५ वर्षे, लिंबू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ४ वर्षे, संत्रा, मोसंबी, पेरू, सीताफळ फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ३ वर्षे, डाळिंब, द्राक्ष फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय २ वर्षे, केळी, पपई, स्ट्रॉबेरी पिकासाठी उत्पादनक्षम वय नाही. त्यापेक्षा कमी वयाच्या फळबागा लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण संपुष्टात येईल.

ही योजना पुढीलप्रमाणे कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येते. जळगाव, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, वर्धा आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनी लि., जालना जिल्ह्यासाठी फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., छत्रपती संभाजीनगर, धाराशिव ,अमरावती,अकोला, नागपूर, परभणी, रायगड, नंदुरबार जिल्ह्यासाठी युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. आणि ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सांगली, लातूर, बुलढाणा, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, बीड, आणि वाशिम जिल्ह्यासाठी बजाज अलियांन्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.



आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये फळपिक द्राक्ष पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ३ लाख ८० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम १ लाख २७ हजार असून शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ असा आहे

मोसंबी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ३३ हजार आहे. केळी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. पपई पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ४० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम १३ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ असा आहे

संत्रा पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ३३ हजार आहे. काजू पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख २० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ४० हजार आहे. आंबा (कोकण) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ असा आहे.

आंबा (इतर जिल्हे) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३१ डिसेंबर २०२४ असा आहे.

स्ट्रॉबेरी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम दोन लाख ४० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ८० हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ असा आहे.डाळिंब पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ६० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५३ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक १४ जानेवारी २०२५ असा आहे.योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता सर्वसाधारण पणे विमा संरक्षित रकमेच्या ५% असतो. मात्र काही जिल्ह्यात तो जास्त असू शकतो .

आंबिया बहार सन २०२४–२५ या वर्षासाठी अधिसूचित फळ पिके, समाविष्ट हवामान धोके व विमा संरक्षण कालावधी निश्र्चित करण्यात आला आहे. अवेळी पाऊस, कमी /जास्त तापमान, वेगाचे वारे, गारपीट इत्यादी निर्धारीत केलेले हवामान धोके (थशरींहशी ढीळससशीी)लागू झाल्यास विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत देय होणार आहे.

योजनेत सहभाग करीता राष्ट्रीय पिक विमा पोर्टल (https://pmfby.gov.in) या संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच आंबिया बहारात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांसाठी गारपीट या हवामान धोक्यासाठी राज्य शासनामार्फत विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्यात आलेले असुन गारपीट या हवामान धोक्यासाठी सहभाग ऐच्छिक राहील व याकरीता अतिरिक्त विमा हप्ता देय आहे. ज्या शेतकऱ्यांना गारपीट या हवामान धोक्याकरिता सहभाग नोंदवावयाचा असेल अशा शेतकऱ्यांनी त्यांचा नियमीत व अतिरिक्त विमा हप्ता हा बँकांमार्फतच भरणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी अधिसुचित फळपिकांच्या हवामान धोक्यांची तसेच त्यांना भरावयाच्या विमा हप्त्याची माहिती करुन घेऊन विहित मुदतीमध्ये नजिकच्या ई–सेवा केंद्र किंवा बँक / वित्तीय संस्था यांच्याशी संपर्क साधून सहभाग नोंदवावा. आंबिया बहारातील अधिसुचित योजनेच्या अधिक माहितीसाठी सबंधित विमा कंपनीचे तालुका कार्यालय किंवा कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

## अशा प्रकारे सफरचंद खाल्ले तर झपाट्याने कमी होईल वजन, जाणून घ्या काय आहे खास ५ दिवसांच्या सफरचंद आहारात

वजन वाढणे हे आजकाल सामान्य झाले आहे, पण ते कमी करणे एखाद्या मोठ्या काम ापेक्षा कमी नाही. केवळ आहारात बदल करून नाही, तर आहारात बदल करूनही वजन कमी करता येते. येथे आम्ही सफरचंदाने वजन कमी करण्याचा ट्रेंडिंग आणि अनोखा मार्ग सांगणार आहोत. सफरचंदात असे घटक असतात, जे वजन वाढणे, कर्करोग, टाइप २ मधुमेह यांसारख्या आजारांपासून आपले संरक्षण करतात. याशिवाय सफरचंद आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासोबतच बद्धकोष्ठतेपासूनही आपले संरक्षण करते.



सफरचंदाशी संबंधित ५ दिवसांच्या सफरचंद आहाराची पद्धत ट्रेंडिंग आहे. या सफरचंद आहाराची संपूर्ण माहिती ेब्तमीरो.म्दस् वर देण्यात आली आहे. आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक सांगू आणि तुम्ही ते कसे फॉलो करू शकता.

जलद वजन कमी करण्यासाठी हा ५ दिवस ॲपल डाएट रूटीन फॉलो करा.

– आठवड्याच्या पहिल्या दिवशी सफरचंदाचे सेवन नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीच्या जेवणात केले पाहिजे.

– दुसऱ्या दिवशी नाश्ता आणि रात्रीच्या जेवणात सफरचंदापासून बनवलेल्या गोष्टी खाव्या लागतात. तर दुपारच्या जेवणात भाज्यांसोबत सफरचंद खावे लागते.

तिसऱ्या दिवसापासून ते ५ व्या दिवसापर्यंत, तुम्हाला केवळ फळेच नव्हे तर सफरचंदांसह ताजे रस, भाज्या स्मूदी, प्रथिने आणि दुग्धजन्य पदार्थ देखील खावे लागतील.

येथे आहे सफरचंद आहाराचे संपूर्ण तपशील

सफरचंद आहार दिवस १

न्याहारीमध्ये २ सफरचंद

दुपारच्या जेवणात १ सफरचंद

रात्रीच्या जेवणासाठी ३ सफरचंद

सफरचंद आहार दिवस २

न्याहारीमध्ये १ सफरचंद आणि एक ग्लास सोया मिल्क प्या.

दुपारच्या जेवणात १ सफरचंद, दोन गाजर हिरव्या कोशिंबीरसह खा.

रात्रीच्या जेवणात २ सफरचंद खा.

सफरचंद आहार दिवस ३

न्याहारीमध्ये १ सफरचंद, १ स्लाईस मल्टीग्रेन ब्रेड आणि उकडलेले अंडी.

दुपारचे जेवण: १ सफरचंद, काकडी, टोमॅटो, कांदा आणि मीठ असलेले बंगाल ग्रॅम सॅलड

रात्रीच्या जेवणासाठी ब्रोकोली आणि गाजर १ सफरचंद किंवा एक सफरचंद आणि मसूर सूप

सफरचंद आहार दिवस ४

न्याहारीमध्ये १ सफरचंद

दुपारच्या जेवणासाठी १ सफरचंद आणि ग्रील्ड भाज्या

१ सफरचंद आणि बीटरूट आणि सेलेरी स्मूदी डिनरसाठी

सफरचंद आहार दिवस ५

न्याहारीमध्ये १ सफरचंद आणि १ उकडलेले अंडे

दुपारच्या जेवणासाठी सफरचंद आणि ग्रील्ड भाज्या

संध्याकाळच्या नाश्त्यात एक कप ग्रीन टी आणि एक पचेल असे बिस्किट

रात्रीच्या जेवणात १ सफरचंद आणि राजम ाची भाजी

## मानेमध्ये सततचे दुखणे, या टिप्स चुटकीसरशी देतील आराम

चुकीच्या पद्धतीने झोपणे, ताण घेणे आणि बराच वेळ एकाच शारीरिक स्थितीत बसणे यामुळे अनेक वेळा मान दुखू लागते. मान ताठ झाल्यामुळे होणारा त्रास कधी कधी असह्य होतो आणि त्यामुळे डोकेदुखीही सुरू होते. कधीकधी हे गर्भाशयाच्या ग्रीवेमुळे होऊ शकते, परंतु त्यातून आराम मिळणे खूप महत्वाचे आहे. मानदुखीवर लोक मलम लावतात, तर कधी औषध घ्यावे लागते. पण वेळोवेळी औषधांचा अवलंब करणे योग्य आहे का?

मानेच्या दुखण्याने इतका त्रास होतो की काम ावर लक्ष केंद्रित करता येत नाही. एवढेच नाही तर इतरही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तसे, काही घरगुती उपायांच्या मदतीने तुम्ही या समस्येवर मात करू शकता. चला तुम्हाला काही टिप्स सांगतोष्ठ

जर तुम्हाला मानेच्या दुखण्यापासून मुक्ती मि ळवायची असेल, तर ॲपल सायडर व्हिनेगरची मदत घ्या, जे अँटीऑक्सिडंटस आणि अँटी–इंफ्लेमेटरी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. यातील हे गुणधर्म स्नायूंचा ताण कमी करण्याचे काम करतात. सफरचंद व्हिनेगर टिश्यूमध्ये भिजवावे आणि मानेमध्ये दुखत असेल तेथे ठेवावे. दिवसातून किमान दोनदा ही रेसिपी फॉलो करा. चहाच्या झाडाचे तेल किंवा लॅव्हेंडर तेलामध्ये अनेक घटक असतात, जे स्नायूंचा ताण कमी करू शकतात. मानदुखीतही याचा वापर करावा. नारळ किंवा मोहरीचे तेल घ्या आणि त्यात आवश्यक तेलाचे काही थेंब घाला आणि मानेवर मालिश करा. हे दिवसातून दोनदा करा आणि तुम्हाला काही वेळातच फरक दिसून येईल.

# कमी पाणी प्यायल्यामुळे फक्त किडनीच नाही तर हे ४ अवयव होतात निकामी

आपल्या शरीरासाठी पाणी खूप महत्वाचे आहे आणि जेव्हा आपण आजारी पडतो किंवा आरोग्याशी संबंधित कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवते तेव्हा आपल्याला इतर आरोग्य सल्ल्यांसोबत भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. आपल्या शरीराच्या प्रत्येक अवयवाला पाण्याची गरज असते. जर तुम्ही रोजच्या तुलनेत कमी प्रमाणात पाणी प्याल तर त्यामुळे आपल्या आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात. त्याच वेळी, जेव्हा शरीरातील पाणी हळूहळू कमी होऊ लागते, तेव्हा शरीराच्या अनेक भागांवर देखील परिणाम होऊ लागतो. काही लोकांना असे वाटते की जेव्हा शरीरात पाण्याची कमतरता असते तेव्हा आपल्या किडनीवर परिणाम होतो. शरीरात पाण्याच्या कमतरतेचा परिणाम फक्त किडनीवर होत नाही तर शरीराच्या इतर अनेक भागांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो, ज्याबद्दल आम्ही तुम्हाला या लेखात सांगणार आहोत. याबाबत माहिती या लेखात जाणून घेणार आहोत.

मेंदू

मेंदू हा आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचा अवयव आहे, ज्याचे कार्य देखील खूप गुंतागुंतीचे आहे. जर तुमचा मेंदू नीट काम करू शकत नसेल तर शरीरात पाण्याची कमतरता हे देखील असू शकते. जर तुम्ही खूप कमी पाणी प्याल आणि डिहायड्रेट झाला तर तुमच्या किडनीवरही याचा परिणाम होऊ शकतो.

हृदय

आजकाल, हृदयाशी संबंधित आजारांचा धोका वाढत आहे, जो पाण्याच्या कमतरतेमुळे खराब जीवनशैली आणि अस्वस्थ आहारामुळे देखील होऊ शकतो. वेळेवर पाणी न पिणे किंवा पुरेसे पाणी न पिणे हे देखील तुमच्या वाईट जीवनशैलीचा किंवा अस्वस्थ आहाराचा भाग असू शकतो. शरीरात पाण्याची



कमतरता हृदयावर परिणाम करू शकते आणि त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

यकृत

शरीरात पाण्याच्या कम तरतेमुळे तुमचे यकृतही खराब होऊ शकते आणि विशेषत: ज्यांचे यकृत नीट काम करत नाही अशा लोकांनी त्यांच्या शरीरात पाण्याचा पुरवठा निश्चितपणे राखला पाहिजे. पाण्याशिवाय आपल्या शरीरातील इतर अवयवांप्रमाणे यकृतावरही गंभीर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे अनेक गंभीर आजारांचा धोकाही वाढतो.

आतडे

शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे आतड्यांवरही परिणाम होतो. त्यामुळे बद्धकोष्ठता इत्यादी समस्या देखील दिसू शकतात. शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे पचनक्रिया नीट होत नाही. ज्याचा थेट परिणाम तुमच्या आतड्यांच्या आरोग्यावर होतो. जर तुम्ही पुरेसे पाणी प्यायले नाही तर त्याचा परिणाम हळूहळू तुमच्या आतड्यांवर होऊ शकतो.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नक्षलवाद बीमोड करणे काळाची गरज




'भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी)' अर्थात 'सीपीआय (एम)' या राजकीय पक्षाने दि. २१ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर २०२४ या काळात, पक्षाच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्ताने २५ पानांची एक पुस्तिका प्रसिद्ध केली. वास्तविकपणे, २००९ पासूनच आपल्या देशात 'सीपीआय (एम)'वर 'दहशतवाद विरोधी कायदा (युएपीए)' कायद्यांतर्गत बंदी घातली आहे. चारु मुजूमदार आणि कान्हाई चॅटर्जी यांनी १९६८ मध्ये नक्षल चळवळीची स्थापना केली होती. त्यानंतर या चळवळीच्या कारवायांमध्ये फुट पडून अनेक गट पडले. त्यानंतर दि. २१ सप्टेंबर २००४ मध्ये मार्क्स, लेनिन आणि माओच्या तत्वांनी प्रेरित झालेल्यांनी एकत्र येऊन 'सीपीआय (एम)' या संघटनेची स्थापना केली. अमेरिका पुरस्कृत भांडवलशाही आणि या देशात उरलेली सरजांमशाही प्रवृत्ती समूळ नष्ट करण्यासाठी, सशस्त्र क्रांतीच्या आधारे सत्ता काबीज करण्याचे ध्येय या संघटनेने निर्धारित केले होते.

या क्रांतीची सुरुवात देशाच्या ग्रामीण भागातून करून, पुढे शहरी भागात मोठ्या प्रमाणात विस्तार करण्याची या संघटनेची योजना आहे. 'सीपीआय (एम)' या संघटनेच्या मते, शहरी भागात त्यांच्या विचारांशी साधर्म्य राखणारे कार्यकर्ते, संघटना पुरस्कृत क्रांतीला सहानुभूती देऊन, व्यापक जनआंदोलनाला पुढे नेतील. याच विचाराने भारलेल्या 'सीपीआय (एम)' या संघटनेनच्या पत्रकाप्रमाणे गेल्या २० वर्षांत त्यांनी निमलष्करी आणि पोलीस दलांवर अनेक हल्ले करून ३ हजार ९० कमांडो किंवा पोलिसांची हत्या केली आहे. या संघटनेच्या लोकांनी केलेल्या हल्ल्यांत आजवर ४ हजार ७७ जण जखमी झाले आहेत, २ हजार ३६६ आधुनिक शस्त्रास्त्रे तसेच १ लाख १९ हजार ६८२ गोळ्यांच्या फेर्या पळवल्या आहेत. परंतु ही दर्पोक्ती करीत असतानाच, या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अनेक अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांची निव्वळ ते पोलिसांचे खबरी असल्याच्या संशयावरून नृशंस अशी हत्या केली आहे, त्यावर मात्र पत्रक मौन बाळगून आहे.. चळवळीतील क्रौर्याने हाताश होऊन आत्मसमर्पण केलेल्या सहकार्यांचीही माओवाद्यांनी अमानुषपणे हत्या केली. या देशात सामाजिक न्याय, वास्तविक स्वातंत्र्य, लोकराज्याची स्थापना आणि देश तोडणे सहज शक्य होईल, असे स्वयंनिर्णयाचे स्वातंत्र्य हवे असल्यास 'सशस्त्र क्रांती' हा एकच मार्ग असल्याचे 'सीपीआय (एम)' या संघटनेचे ठाम मत आहे. 'सीपीआय (एम)' या संघटनेने छापलेल्या पुस्तिकेमध्ये ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तीन उत्तम मार्गही नमूद केले आहेत. त्यामध्ये पहिले म्हणजे 'सीपीआय (एम)' ही संघटना, त्यानंतर दंडकारण्यात सक्रिय असलेली 'पीपल्स लिबरेशन आर्मी' आणि या संघटनेच्या बेकायदेशीर कृत्यांसाठी शहरी भागांमध्ये सहानुभूती आणि संसाधने उभे करणारे शहरी भागातील संघटन होय.

या संघटनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी सन २००७ मध्ये 'सीपीआय (एम)'ने त्यांची रणनीती स्पष्ट केली होती. त्यामध्ये सर्वप्रथम जास्तीत जास्त भारतीय सैन्य, पोलीस आणि सरकारी अधिकार्यांचा यांचा खात्मा करण्याबाबत रणनीती निश्रि्चत केली होती. संघटनेला अपेक्षित असणारे मुक्त क्षेत्र निर्माण करण्यासाठी हे करणे अत्यावश्यक होते. तसेच या नक्षलवादी चळवळीसाठी नवीन तरुणांची भरती करणे, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुनिश्रि्चत करणे, तसेच लढण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळवण्याचे उद्दिष्टदेखील निश्रि्चत करण्यात आले होते. तसेच या चळवळीचा प्रसार सर्वदूर करण्यासाठी प्रामुख्याने कामगार, अर्धकुशल कामगार, मध्यमवर्गीय बुद्धिजीवी आणि विद्यार्थी यांना सहभागी करुन घेण्याबाबत ठरविण्यात आले होते. तसेच या चळवळीच्या यशासाठी महिला, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींपर्यंत पोहोचण्याचे अधिक प्रयत्न केले जावेत, असे ठरवण्यात आले. तसेच चळवळीतील कार्यकर्त्यांना कामगारांच्या शोषणाविरोधात, जागतिकीकरणाला विरोध करण्यासाठी आणि हिंदू वर्चस्वाविरोधात लढा देण्यासाठी, प्रोत्साहन देण्याबाबतही चर्चा झाली. एवढेच नव्हे तर शहरी नक्षलवादी, संघटनेच्या कार्यकर्त्यांना निमलष्करी दल, पोलीस दल आणि वरिष्ठ सरकारी अधिकार्यांच्या वर्तुळात घुसखोरी करण्यासाठीही प्रोत्साहन दिले जाणार होते.

प्रशासकीय व्यवस्थेत घुसखोरी केलेल्या या संघटनेच्या शहरी कार्यकर्त्यांनी चळवळीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी अचूक माहिती देणे, मोक्याची माहिती देऊन चळवळीला सर्वप्रकारे साहाय्य करणे, शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याचा गरजेनुसार पुरवठा सुनिश्रि्चत करणे, प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन, औषधांचा पुरवठा करणे, चळवळीला प्रसिद्धी देणे आणि जखमी व्यक्तींना मदत करून, चळवळीला अंतर्गत मदत करणे इत्यादी अपेक्षित आहे. सद्यस्थितीत, देशात अशा सुमारे २२७ विविध संस्था कार्यरत आहेत, ज्या वरुन उपद्रवशून्य दिसत असल्या तरी चळवळीचे खोलवर कार्य करत आहेत. या संस्था 'ए ४' म्हणून वर्गीकृत असून, त्या संस्थांना कम्युनिस्ट नसलेल्या समाजवादी विचारांच्या संघटना म्हणून ओळखले जाते. या संस्थांमधील काही सदस्यही चळवळीत सक्रिय सहभागी होण्याची इच्छा बाळगून असतात. मग त्यांना प्रारंभी प्रबोधनासाठी निवडण्यात येते. त्यानंतर त्यांची पदोन्नती होऊन त्यांना 'ए ३' अर्थात सशस्त्र क्रांती करणार्यांपर्यंत त्यांची पदोन्नती होते. या चळवळीविषयी सहानुभूती बाळगून असणारे पक्षाचे कार्यकर्ते काही राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय विद्यापीठांतील विद्यार्थी चळवळीतही दृष्टिपथास पडतात. 'सीपीआय (एम)'ने पक्षाच्या कार्यकर्त्यांना नुकत्याच दिलेल्या निर्देशांनुसार, 'सीपीआय (एम)' हा पक्ष भारतीय जनता पक्षाला क्रमांक एकचा शत्रू मानतो आणि भाजपचा पराभव करण्याचे ध्येयच या पक्षाने निश्रि्चत केले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी विरोधी पक्षामध्ये सहभागी होऊन भारतीय जनता पक्षाविरोधात प्रचार करण्याचे आदेश 'सीपीआय (एम)'ने त्यांच्या कार्यकर्त्यांना दिले आहेत.

वास्तविक पाहता, नक्षली चळवळ पश्रि्चम बंगालमधील सिलीगुडीजवळील नक्षलबारी येथून सुरू झाली असली तरी, तिचा विस्तार अल्पकाळातच पशुपतीपासून तिरुपतीपर्यंत जवळपास सर्वच राज्यांमध्ये झालेला दिसतो. २०१३ पर्यंत तर देशातील ११० हून अधिक जिल्ह्यांमध्ये या चळवळीचे संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले होते. मात्र, २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे बहुमताचे सरकार सत्तेत आले. त्यानंतर मोदी सरकारने 'अंत्योदया'च्या सिद्धातांनुसार, त्यांचे सर्व विकासात्मक उपक्रम कोणत्याही अडचणीशिवाय शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचावेत, यासाठी एक खिडकी मदत योजनेसह विविध विकासात्मक उपाययोजना सुरू केल्या. या योजनेंतर्गत, अधिवासाचे प्रमाणपत्र, तसेच आवश्यक अन्य सर्व प्रमाणपत्रे, तरुणांना व्यावसायिक कौशल्ये, रोजगार किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठीच्या सुविधांचा लाभ मिळेल हे देखील सुनिश्रि्चत करण्यात आले. गडचिरोली जिल्ह्यातील दहा हजारांहून अधिक तरुण मुला-मुलींनी या योजनेचा लाभ घेतला असून, ते याबाबत अत्यंत समाधानी आहेत. या योजनांव्यतिरिक्त अनेक राज्य सरकारांनीही 'सीपीआय (एम)' पुरस्कृत नक्षलवादी चळवळीपासून विभक्त होऊ इच्छिणार्यांसाठी 'समर्पण धोरण' तयार केले असून, याचा लाभ घेणार्यांसाठी पुनर्वसनाच्या योजनादेखील कार्यान्वित केल्या आहेत. नक्षलवाद्यांनी 'बाल सैनिक' म्हणून पकडलेल्या आणि चळवळीत महत्त्वाच्या पदावर कार्यरत महिलांसह, अनेक नक्षलवादी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे सरसावले आहेत. सरकारच्या या धोरणामुळे नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला आहे. याशिवाय, सरकारने खनन क्षेत्रात स्थानिक अनुसूचित जमातीच्या कर्मचार्यांच्या सहकार्याने खाणकाम सुरू केले आहे. यामुळे अनेकांना शाश्र्वत रोजगार मिळत असून, स्थानिकांच्या जीवनमानावर त्याचा सकारात्मक परिणाम झालेला आज दिसतो. पूर्वी नक्षल चळवळीने ग्रस्त असलेल्या जिल्ह्यांपैकी अनेक जिल्ह्यांना भारत सरकारने 'महत्त्वाकांक्षी जिल्हे' म्हणूनही घोषित केले आहे. तसेच या जिल्ह्यांमध्ये रस्ते आणि दूरसंचार सुविधांव्यतिरिक्त चांगल्या वैद्यकीय आणि शैक्षणिक सुविधांद्वारे स्थानिकांची स्थिती सुधारण्यासाठीही सरकारी पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.



भारत सरकारने नक्षलवादग्रस्त जिल्ह्यांतील पोलीस दलांमध्ये गुप्त माहिती, पोलीस दलातील समन्वय, प्रशिक्षण कार्यक्रम याचा विकास करण्यासाठी उपाययोजना राबविल्या आहेत. कायद्याची अंमलबजावणी करणार्या यंत्रणांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी, त्यांनी अतिरिक्त निमलष्करी दल आणि वित्तपुरवठाही केला आहे. परिणामी, नक्षलवादी चळवळीचा प्रतिकूल परिणाम झालेल्या जिल्ह्यांची संख्या आधीच्या ११० वरून ३४ जिल्ह्यांवर आली आहे. सध्या छत्तीसगढमधील अबुजमल पहाड भागात 'सीपीआय (एम)' सक्रिय असल्याचे दिसून येते. कठीण भूभाग, दुर्गम वस्ती यामुळे या भागाला 'मुक्त क्षेत्र' म्हणून संबोधणार्या नक्षलवाद्यांनी पसरवलेल्या अराजकतेला स्थानिकांची असाहाय्यताही कारणीभूत ठरली आहे. या भागातील नक्षली हल्ल्यांमुळे होणारे सुरक्षा यंत्रणांचे नुकसान कमी करणे, नक्षलवाद्यांच्या विरोधात लढण्यासाठी स्थानिकांना मदत करणे आणि या माध्यमातून नक्षली चळवळीचा बिमोड करण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी त्वरीत नवीन ड्रोन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे.

अशा प्रशासकीय पातळीवरील उपायांव्यतिरिक्त, सर्व लोकशाहीवादी आणि स्वातंत्र्याची जोपासना करणार्या राजकीय पक्ष, सर्व विरोधी पक्ष, माध्यमे, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिक यांसारख्या समाजात प्रभावशाली असणार्यांनी हे लक्षात घेणे अत्यावश्यक आहे की, सीपीआय (एम) ची विचारधारा ही कदापि बदलणारी नाही. त्यांनी सशस्त्र क्रांतीद्वारे भारत तोडण्याचा आणि माओवाद्यांच्या हुकूमशाहीचा उदय करण्यासाठी, राजकीय सत्ता काबीज करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे भारतातील लोकशाही, स्वातंत्र्य सुनिश्रि्चत करण्यासाठी 'सार्वजनिक सुरक्षा विधेयक, २०२४' जे महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आले आहे, त्यास सर्व राजकीय पक्षांनी एकमुखी पाठिंबा देणे गरजेचे आहे. नुकताच भारताच्या गृह मंत्र्यांनी मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद समाप्त करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. वरील योजनांमुळे नक्षलवादाची पाळेमुळे तो पर्यंत नक्कीच नष्ट होतील असा विश्र्वास आहे.

**-प्रविण दिक्षित**
**माजी पोलीस महासंचालक**
**महाराष्ट्र राज्य**

## तुमच्या मागे तुमच्या पार्टनरचे काय सुरुये, डबल डेट तर करत नाही ना? 'या' टिप्सने त्याला रंगेहात पकडा

डबल डेटिंग ही एकाच वेळी दोन पार्टनरसोबत प्रेमसंबंध ठेवण्याची प्रक्रिया आहे. डबल डेटिंगमध्ये लोक एकाच वेळी दोन प्रेमसंबंध प्रस्थापित करतात. या सगळ्यात बहुतेकदा एखाद्या जोडीदाराची फसवणूक होते, आपला पार्टनर आपल्यामागे काय करतो हे अनेकांना माहित नसतं. तुम्हालाही जर तुमच्या जोडीदाराकडून डबल डेटिंगचे संकेत मिळाले तर तुम्ही या प्रकरणाचा छडा लावू शकता.

तुमचा पार्टनर तुमची फसवणूक करत असल्याची काळजी तुम्हाला वाटत असेल, पण तुम्हाला त्याचा कोणताही पुरावा सापडत नसेल, तर या सोप्या पद्धती तुम्हाला खूप मदत करू शकतात. कोणतंही नातं पुढे नेण्यापूर्वी तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या खोट्या गोष्टींबद्दल आणि खोट्या वागणुकीबद्दल माहित असलं पाहिजे, तर तुमची होत असलेली मोठी फसवणूक टळू शकते. यासाठी खाली दिलेल्या पद्धतींचा अवलंब करा.

जोडीदाराला कचाट्यात पकडण्यासाठी या गोष्टींचा करा अवलंब

सोशल मीडियावर चेक करा : तुम्ही तुमच्या जोडीदाराचे सोशल मीडिया प्रोफाईल तपासू शकता आणि तो डबल डेटिंग करत आहे का? याचा छडा लावू शकता. त्याचे किंवा तिचे फोटो आणि स्टेटस पाहून तुम्हाला याचे संकेत मिळू शकतात.

मोकळ्या मनाने बोला : जर तुम्हाला वाटत असेल की तुमचा पार्टनर डबल डेट करत आहे तर तुम्ही त्याच्याशी मोकळ्या मनाने बोलू शकता. सर्व काही समजुतीने घेऊन तुम्ही शांतीत सर्व काही विचारू शकता.

जोडीदाराच्या वागण्याकडे लक्ष द्या : तुमच्या जोडीदाराच्या वागण्याकडे लक्ष द्या. तो किंवा ती त्यांचा वेळ कसा घालवत आहे? ते कोणासोबत आहेत? आणि ते कोणत्या प्रकारच्या क्रियाकलापांमध्ये गुंतलेले आहेत? या सर्वाची माहिती ठेवा.

तुमच्या कॉमन फ्रेंड्सला विचारा : तुमचा पार्टनर दुहेरी डेटिंग करत आहे की नाही हे तुम्ही त्याच्या मित्रांशी बोलून देखील जाणून घेऊ शकता. त्यांनी सांगितलं नाही तर जोडीदाराकडूनच कन्फर्मेशन घ्या.

तुमचा तुमच्या नातेसंबंधावर विश्वास असणे आणि खुल्या मनाने संवाद साधणे महत्त्वाचे आहे. प्रेमसंबंधांत जर तुमची फसवणूक होत आहे, असं तुम्हाला जाणवत असेल आणि ते अशी फसवणूक सहन करण्याची तुमची स्थिती नसेल तर लगेच नात्याला नाही म्हणा आणि अशा नात्यातून बाहेर पडा.

## दर महिन्याला मासिक पाळीची तारीख बदलते, कारण आणि घरगुती उपाय

मासिक पाळी ही महिलांमध्ये एक सामान्य आणि नियमित प्रक्रिया आहे. मासिक पाळी दर महिन्याच्या एका निश्चित तारखेला येते. कधीकधी मासिक पाळी अनियमित होते आणि त्याचा शरीरावर परिणाम होतो. अनेक महिलांसाठी त्रासाचे कारण बनते. जरी, मासिक पाळी न येण्याचे सर्वात साम ान्य कारण म्हणजे गर्भधारणा, परंतु जेव्हा तुम्ही गर्भधारणेचे नियोजन करत नसाल, तेव्हा मासिक पाळी न येणे ही चिंतेची बाब असू शकते. याची अनेक कारणे असू शकतात. आजकाल महिलांमध्ये मासिक पाळी येण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे तणाव आणि चुकीची जीवनशैली. या लेखाच्या माध्यमातून आपण अनियमित मासिक पाळीची कारणे आणि घरगुती उपाय जाणून घेणार आहोत.

एका अहवालानुसार, अनियमित मासिक पाळी येण्याचे एक कारण म्हणजे पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम म्हणजेच पीसीओसी, जी हार्मोनल समस्या आहे. याशिवाय लैंगिक संसर्गामुळेही मासिक पाळी अनियमित होते.

तणाव हे अनेक आजारांचे कारण आहे. यातील एक समस्या म्हणजे अनियमित मासिक पाळी. महिलांच्या शरीरात इस्ट्रोजेन, प्रोजेस्टेरॉन आणि टेस्टोस्टेरॉन हे तीन हार्मोन्स असतात, ते बिघडल्यामुळे मासिक पाळीचे चक्रही बिघडू लागते. या सर्व समस्या तणावामुळे उद्भवतात.

# विचारांच्या गोंधळामुळे मानसिक आजार

जागतिक मानसिक आरोग्य दिन हा जागतिक मानसिक आरोग्य शिक्षण, सामाजिक कलंक विरुद्ध जागरूकता आणि वकिलीसाठी आंतरराष्ट्रीय दिवस आहे. १९९२ मध्ये १५० हून अधिक देशांमध्ये सदस्य आणि संपर्क असलेल्या जागतिक मानसिक आरोग्य संघटनेच्या आणि उपमहासचिव रिचर्ड हंटर यांच्या पुढाकाराने १० ऑक्टोबर १९९२ रोजी प्रथमच जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. तेव्हा पासून दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' आणि ४ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर या काळात 'जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह' सुद्धा साजरा केला जातो. या दिवशी हजारो समर्थक मानसिक आजार आणि जगभरातील लोकांच्या जीवनावर त्याचे मोठे परिणाम याकडे लक्ष वेधण्यासाठी हा वार्षिक जागरूकता कार्यक्रम साजरा करण्यासाठी येतात. या व्यतिरिक्त हा दिवस मानसिक आरोग्य व्यावसायिकांना चर्चा करण्याची आणि त्यांच्या कामावर प्रकाश टाकण्याची संधी प्रदान करतो, ज्यामुळे जगभरात मानसिक आरोग्याला प्राधान्य दिले जाते. काही देशांमध्ये हा दिवस जागरूकता सप्ताहाचा भाग आहे, जसे की ऑस्ट्रेलियातील मानसिक आरोग्य सप्ताह.

एक काळ असा होता की, मानसिक समस्या काय, त्यांच्या मानसिक समस्यांबद्दलही लोक इतरांशी बोलण्यास लाजत असत, जेणेकरून लोकांनी त्यांना मानसिक रुग्ण समजू नये. परंतु सध्याच्या काळात, विशेषत: कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर, मानसिक आरोग्य राखण्यासाठी जागतिक स्तरावर लोकांमध्ये जागरूकता वाढू लागली आहे. गेल्या काही वर्षांत सर्व वयोगटातील लोकांमध्ये मानसिक विकार किंवा आजारांसारख्या मानसिक समस्या वाढण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. ज्याला जगभरातील मानसोपचार तज्ज्ञांची आकडेवारी आणि परिणाम आणि विविध संशोधनातून पुष्टी मिळते. अशा स्थितीत १० ऑक्टोबर रोजी जगभरात साजऱ्या होणाऱ्या 'जागतिक मानसिक आरोग्य दिना'चे महत्त्व अधिकच वाढले आहे.

१९९४ पर्यंत या दिवसाची सर्वसाधारणपणे मानसिक आरोग्याची वकिली करणे आणि लोकांना शिक्षित करणे याशिवाय कोणतीही विशिष्ट थीम नव्हती. १९९४ मध्ये तत्कालीन सरचिटणीस यूजीन ब्रॉडी यांच्या सूचनेनुसार जागतिक मानसिक आरोग्य दिन प्रथमच थीमसह साजरा करण्यात आला. जगभरातील मानसिक आरोग्य सेवांची गुणवत्ता सुधारणे ही थीम होती.

जागतिक मानसिक आरोग्य दिनाला जागतिक आरोग्य संघटनेद्वारे जगभरातील आरोग्य मंत्रालये आणि नागरी समाज संस्थांशी मजबूत संबंध वापरून मानसिक आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करून पाठिंबा दिला जातो. डब्ल्यूएचओ तांत्रिक आणि संप्रेषण सामग्री विकसित करण्यास देखील समर्थन देते. जागतिक मानसिक आरोग्य दिन २०१८ रोजी पंतप्रधान थेरेसा मे यांनी जॅकी डॉयल-प्राइस यांची यूकेचे पहिले आत्महत्या प्रतिबंध मंत्री म्हणून नियुक्ती केली. सरकारने पहिल्या जागतिक मानसिक आरोग्य शिखर परिषदेचे आयोजन केले असताना हे घडले.

लोकांमध्ये मानसिक समस्यांबाबत जागरुकता पूर्वीपेक्षा वाढली असली, तरी गेल्या काही वर्षांत वेगवेगळ्या कारणांमुळे लोकांमध्ये मानसिक समस्यांचे प्रमाण वाढले आहे. ही चिंतेची बाब आहे की, अजूनही मोठ्या संख्येने लोक डॉक्टरांकडे जाऊन उपचार घेण्यास टाळाटाळ करतात, हे समजून घेतल्यानंतरही त्यांना मानसिक त्रास होत आहे. त्याचबरोबर अशा लोकांची संख्याही कमी नाही, जे या समस्येची लक्षणे दाखवून ही त्यांना मानसिक समस्या असल्याचे मान्य करू शकत नाहीत. त्या स्पष्ट करतात की शिक्षण, नोकरी, अस्थिर भविष्य, नातेसंबंध किंवा कामाच्या ठिकाणी तणाव, कोणत्याही अपघाताचा किंवा शोषणाचा परिणाम आणि सध्याच्या काळातील खराब जीवनशैली या सर्व वयोगटातील महिला आणि पुरुषांमध्ये मानसिक समस्या निर्माण करणारे अनेक घटक आहेत. त्याचवेळी सर्वात चिंतेची बाब म्हणजे मानसिक समस्यांना सामोरे जाणाऱ्या लोकांमध्ये मोठ्या संख्येने मुले आणि तरुण प्रौढ आहेत. विशेष म्हणजे, जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी देखील पुष्टी करते की जगभरात मानसिक समस्यांनी ग्रस्त असलेल्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १६% लोक १० ते १९ वर्षे वयोगटातील आहेत. संस्थेने प्रसिद्ध केलेल्या विविध अहवालांमध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, जगातील प्रत्येक चार व्यक्तींपैकी एकाला त्यांच्या आयुष्यात कधी ना कधी मानसिक विकार किंवा न्यूरोलॉजिकल विकारांचा सामना करावा लागतो. त्याच वेळी, जगभरात सुमारे ४५० दशलक्ष लोक मानसिक आरोग्य समस्या आणि विकारांनी ग्रस्त आहेत.

आपले मानसिक, भावनिक आणि सामाजिक कल्याण या सर्व गोष्टी आपल्या मानसिक आरोग्यामध्ये भर घालतात. याचा परिणाम विविध गोष्टींवर होतो, जसे की जीवनातील आव्हानांना सामोरे जाताना आपण कसे वाटते, विचार करतो आणि वागतो. आपण कसे निर्णय घेतो, तणावाचे व्यवस्थापन कसे करतो आणि नातेसंबंध कसे बनवतो यावर त्याचा प्रभाव पडतो. बालपण आणि पौगंडावस्थेपासून प्रौढत्वापर्यंत आणि वृद्धत्वापर्यंत संपूर्ण आयुष्यभर मानसिक आरोग्य आवश्यक आहे. आपले मानसिक, भावनिक आणि सामाजिक कल्याण या सर्व गोष्टी आपल्या मानसिक आरोग्यामध्ये भर घालतात. याचा परिणाम विविध गोष्टींवर होतो, जसे की जीवनातील आव्हानांना सामोरे जाताना आपण कसे वाटते, विचार करतो आणि वागतो. आपण कसे निर्णय घेतो, तणावाचे व्यवस्थापन कसे करतो आणि नातेसंबंध कसे बनवतो यावर त्याचा प्रभाव पडतो. बालपण आणि पौगंडावस्थेपासून प्रौढत्वापर्यंत आणि वृद्धत्वापर्यंत संपूर्ण आयुष्यभर मानसिक आरोग्य आवश्यक आहे.

विशेष म्हणजे विविध प्रकारचे मानसिक समस्या किंवा आजार असतात. त्यापैकी काही न्यूरोलॉजिकल समस्या शारीरिक रोग, वृद्धत्व आणि आनुवंशिकता असू शकतात तर काही अपघात किंवा धक्का, शारीरिक शोषण, विभक्त होणे किंवा कौटुंबिक समस्या, एकटेपणा, खराब दिनचर्या आणि परिस्थितीजन्य कारणांमुळे असू शकतात. काहीवेळा काही मानसिक समस्या इतक्या गंभीर असू शकतात की, त्यामुळे पीडित व्यक्तीमध्ये आत्महत्या करण्याची आणि स्वतः ला किंवा इतरांना इजा करण्याची तीव्र इच्छा निर्माण होऊ शकते. म्हणूनच समस्येच्या अगदी सुरुवातीस लक्षणे समजून घेण्याचा प्रयत्न करणे खूप महत्वाचे आहे. सध्या लोकांमध्ये सामान्यतः दिसणार्या मानसिक समस्या म्हणजे नैराश्य किंवा तणाव, चिंता विकार जसे की सामान्य चिंता विकार (जीएडी), वेड-कंपल्सिव्ह डिसऑर्डर (ओसीडी), अपघातानंतरचा तणाव विकार (पीटीएसडी), सामाजिक चिंता विकार, स्मृतिभ्रंश आणि त्याचे विविध प्रकार जसे की अल्झायमर, पार्किन्सन रोग, मिश्र स्मृतिभ्रंश, खाण्यापिण्याच्या विकार, सायकोटिक विकार जसे की स्किझोफ्रेनिया, स्किझोएफेक्टिव्ह डिसऑर्डर, संक्षिप्त मनोविकार, भ्रम विकार, पदार्थ-प्रेरित मूड डिसऑर्डर इत्यादी.

बहुतेक लोकांना मानसिक आरोग्य समस्यांची लक्षणे आणि प्रकार माहित नाहीत. सुशिक्षित लोकांमध्येही त्यांच्याबद्दल फारशी जागरूकता नाही. अशा परिस्थितीत, एखाद्या व्यक्तीमध्ये मानसिक विकार किंवा रोगाची लक्षणे स्पष्टपणे ओळखली जातात, तेव्हा पीडित व्यक्तीची स्थिती बिघडलेली असते. ती सांगते की केवळ तुमच्या मानसिक आरोग्याविषयीच नव्हे तर तुमचे मित्र, कुटुंब आणि सहकाऱ्यांच्या वर्तनाबद्दलही सजग राहणे खूप महत्त्वाचे आहे. एखाद्याच्या वागण्यात कोणत्याही प्रकारची समस्या असल्यास किंवा कोणत्याही मानसिक आजाराची प्रारंभिक चिन्हे किंवा लक्षणे आढळल्यास सर्वप्रथम त्यांच्याशी बोलून त्यांची समस्या समजून घेण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे आणि आवश्यक असल्यास वैद्यकीय मदत घ्यावी.

आजच्या धावपळीच्या युगात सर्वांनाच मानसिक तणावाला सामोरे जावे लागते आहे. त्यातील खूप कमी व्यक्ती मानसिक तणावातून बाहेर पडतात. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याने मानसिक तणाव, डिप्रेशन, एंजायटीपासून हिस्टीरिया, डिमेंशिया, फोबिया सारख्या मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवतात. जगाला मानसिक आरोग्याचे महत्त्व समजण्यासाठी, तसेच जनजागृती करण्यासाठी 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' साजरा केला जातो. त्यामुळे लोकांमध्ये मानसिक आरोग्यासंबंधी जनजागृती होण्यास मदत होते. मानसिक आरोग्य आणि आरोग्य सर्वांसाठी एक जागतिक प्राधान्य बनवा हा या वर्षीचा विषय आहे. जगभरात मानसिक आरोग्य जागरुकता वाढवणे, मानसिक आरोग्याच्या समस्या अनुभवणाऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी प्रयत्नांना एकत्रित करणे आणि जगाला एक चांगले स्थान बनवणे हा या दिवसाचा उद्देश आहे. हा दिवस सर्वसाधारणपणे मानसिक आरोग्यावर चर्चा करण्याची संधी देतो, आपण त्याची काळजी कशी घेतली पाहिजे आणि समस्यांबद्दल बोलणे आणि संघर्ष करत असल्यास मदत घेणे किती महत्त्वाचे आहे. जसे की अनेक आरोग्यविषयक समस्यांच्या गोंधळातून आपण बाहेर पडतो हृदय रोग संसर्ग, जे जगभरात प्रख्यात आहेत, गंभीर रोगांशी लढण्याच्या संभाव्यतेमुळे व्यक्तींना तणाव वाटणे स्वाभाविक आहे. परिणामी, वाढत्या संख्येने लोकांना मानसिक आरोग्य संकटाचा सामना करावा लागला आणि परिस्थितीचा सामना करणे त्यांना आव्हानात्मक वाटले. शिवाय जगभरातील लोकांना दीर्घ काळापासून शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या आव्हानांना सामोरे जावे लागले आहे. भावनिक निरोगीपणा वाढवा, भावनिक आरोग्य सुधारा आणि सकारात्मक रहा! शांतीपूर्ण जीवनाचे स्वागत करून आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी मंत्र बनवूया. चला जागतिक मानसिक आरोग्य दिन २०२४ साजरा करू या आणि सर्वत्र सकारात्मकता पसरवू या !



**प्रवीण बागडे**
नागपूर/ भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagdegmail.com

# डॉ. ऋतुजा चव्हाण यांना वंचित ची उमेदवारी जाहीर

## अनेकांचे राजकीय गणित बिघडण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार विधानसभा मतदार संघासाठी वंचित बहुजन आघाडी कडून डॉ. ऋतुजा चव्हाण यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. डॉ. ऋतुजा चव्हाण यांची उमेदवारी अनेकांचे राजकीय गणित बिघडवणारी असल्याने अनेकांची डोकेदुखी वाढली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. यावेळेस शिवसेनेत पडलेली उभी फूट व वंचित बहुजन आघाडी कडून सामाजिक राजकीय पाठबळ असलेल्या डॉ. ऋतुजा चव्हाण यांना उमेदवारी जाहीर झाल्याने मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातील राजकीय गणिते मात्र बिघडण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. उच्चशिक्षित महिला नेतृत्व म्हणून डॉ. चव्हाण त्यांना पसंती मिळत असल्याचे चित्रही दिसून येत आहे.तर मेहकर मतदार संघातही एक महिला व उच्चशिक्षित उमेदवार म्हणून डॉ. ऋतुजा चव्हाण यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यांनी मतदारसंघात केलेले सामाजिक कार्य केले आहे. ही त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत वैद्यकीय क्षेत्रातील एक उच्चशिक्षीत, गोरगरिबांच्या संकटकाळी धावून येणारे, सामाजिक कार्याची, शेतकरी समस्यांची जाण असणारे नेतृत्व म्हणून डॉ. सौ.ऋतुजा ऋषांक चव्हाण यांची ओळख आहे. डॉ.सौ.ऋतुजा चव्हाण ह्या मुळच्या मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील असून राजमाता जिजाऊ सामाजिक फाऊंडेशनच्या अध्यक्ष आहेत. त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील व सामाजिक कार्याचा मोठा वारसा मिळालेला आहे. डॉ.सौ.ऋतुजा यांनी विविध माध्यमातून हजारो गोरगरिब, शेतकरी कुटुंबाची मदत केलेली आहे. स्थानिक एकमेव महिला उमेदवार म्हणून मतदारांकडून विधानसभा निवडणुकीत एक सक्षम पर्याय म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. ओबीसी कुटूंबामधून असणारा मागासवर्गीय उमेदवार आणि विद्यमान आमदारांच्या जातीय समिकरणामध्ये तुल्यबळ असलेला एकमेव उमेदवार, मतदारसंघातील नागरिकांमध्ये असलेला दांडगा जनसंपर्क, स्वच्छ प्रतिमा, महिला सबलीकरणात भरीव कामगीरी, शेतकरी प्रश्नांवर विविध मोर्चे, आंदोलन व बैठकांमध्ये सक्रीय सहभाग, गोर-गरीबांच्या मोफत रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर मतदार संघातील प्रत्येक शहर, ग्रामीण भाग व गांव-वस्त्यांवर वैयक्तीक संपर्क वेळप्रसंगी गोरगरिबांना आर्थिक मदत करणारे म्हणूनत्यांच, वडिलांचा दांडगा जनसंपर्क व नातेवाईकांचा मतदार संघामध्ये मोठा गोतावळा. पतीचे सहकार क्षेत्रात असलेले भरीव योगदान व मतदार संघातील प्रभाव. त्याचबरोबर पतीचे सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य व मतदार संघात दांडगा जनसंपर्क व मोठा मित्र परिवार असून अनेक गरीब व अनाथ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व त्यांनी घेतलेले आहे. शेतकर्यांच्या विविध प्रश्नांवर



अशा अनेक क्षेत्रांतील भरीव योगदानामुळे व सर्व समाजातील एक आपलेसे नेतृत्व म्हणून डॉ. सौ.ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यांना आता वंचितकडून उमेदवारी जाहीर झाल्याने अनेकांची डोकेदुखी मात्र वाढली असल्याची चर्चा मेहकर विधानसभा मतदारसंघात होत आहे.

## विविध वृत्त...

### सैनिकी मुलांच्या वसतिगृहात भाडेतत्वावर भोजन कक्ष, उपहारगृहासाठी २५ ऑक्टोंबरपर्यंत अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त सैनिकी मुलांचे वसतिगृह, चिखली रोड येथे कार्यरत असून त्यामध्ये माजी सैनिकांच्या उपचाराकरिता इसीएचएस कार्यान्वित आहे. इसीएचएसमध्ये दररोज १०० ते १५० माजी सैनिक विधवा तसेच त्यांचे अवलंबित उपचार व योजनेचा लाभ घेण्यासाठी येतात. या सैनिकी मुलांच्या वसगिृहाजवळ १ कि.मी. अंतराच्या आत अल्पोहाराकरीता कोणतेही उपहागृह उपलब्ध नसल्याने वसतिगृहातील भोजनकक्ष भाडेतत्वावर देण्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिक, माजी सैनिक महिला बचत गट, माजी सैनिक विधवा व इतर नागरीक यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे. भोजनकक्ष भाडेत्वावर देण्यासाठी माजी सैनिक महिला बचत गट, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, इतर नागरीक याप्रमाणे प्राधान्य दिल्या जाईल. तरी इच्छूक अर्जदारांनी आपले अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बुलडाणा येथे दि. २५ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

### टाटा ग्रुपमध्ये या महत्त्वाच्या परंपरेचा झाला अंत! ट्रस्टने घेतला महत्त्वाचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : टाटा ट्रस्टने रतन टाटा यांच्या निधनानंतर नियुक्तीसंदर्भात एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. लाइव्ह मिंटच्या रिपोर्टनुसार, सर रतन टाटा ट्रस्ट आणि सर दोराबजी टाटा ट्रस्टचे ट्रस्टी आता स्थायी सदस्य झाले आहेत, ज्यामुळे निश्चित कालावधीच्या नियुक्त्यांची पद्धत संपुष्टात आली आहे. रिपोर्टनुसार, हा निर्णय गुरुवारी झालेल्या दोन्ही ट्रस्टच्या बोर्ड बैठकीत घेण्यात आला. या मोठ्या निर्णयामुळे बोर्डाचे सदस्य तोपर्यंत रिटायर होणार नाहीत, जोपर्यंत ते सदस्य राजीनामा देण्याचा निर्णय घेणार नाहीत. तसेच नवीन सदस्यांची नियुक्ती ट्रस्टच्या सर्व सदस्यांच्या संमतीनंतरच केली जाईल, असेही या रिपोर्टमध्ये म्हटले आहे.

बिझनेस डेलीच्या वृत्तानुसार, दोन ट्रस्टजवळ सामूहिकरित्या टाटा सन्स या १६५ अब्ज डॉलर्स होल्डिंग्जच्या कंपनीतील निम्म्याहून अधिक शेअर्स आहेत. यामध्ये टाटा ग्रुपच्या अनेक नामांकित कंपन्यांच्या शेअर्सचा समावेश आहे. टाटा ट्रस्ट समूहाचे सर्व परोपकारी कार्यक्रम मॅनेज करते.

दोन्ही ट्रस्टजवळ टाटा सन्सचे किती शेअर्स?

रिपोर्टनुसार, सर रतन टाटा ट्रस्टकडे टाटा सन्सचे २७.९८ टक्के शेअर्स आहेत, तर सर दोराबजी टाटा ट्रस्टकडे होल्डिंग फर्मचे २३.५६ टक्के शेअर्स आहेत. ११ ऑक्टोबर रोजी नोएल टाटा यांची टाटा ट्रस्टच्या प्रमुखपदी नियुक्ती झाली. त्यानंतर ट्रस्टने आयोजित केलेली ही दुसरी बोर्ड बैठक होती. मात्र, मनीकंट्रोलला स्वतंत्रपणे या रिपोर्टची पुष्टी करता आली नाही. कॉर्पोरेट आयकॉन रतन टाटा यांचे ९ ऑक्टोबर रोजी ८६ व्या वर्षी मुंबईत निधन झाले. त्यांच्या निधनानंतर टाटा ट्रस्टच्या प्रमुखपदी नोएल टाटा यांची नियुक्ती करण्यात आली होती. नोएल टाटा हे रतन टाटा यांचे सावत्र भाऊ आहेत.

टाटा ग्रुपची पेरेंट कंपनी टाटा सन्स, हॉटेल, ऑटोमोबाईल, कन्झ्युमर प्रॉडक्ट्स आणि एअरलाइन्ससह विविध क्षेत्रांतील ३० फर्म्सची देखरेख करते. गेल्या काही वर्षांमध्ये, टाटा सन्सने जॅग्वार लँड रोव्हर आणि टेटली टी सारख्या ब्रँड्सच्या अधिग्रहणासह ग्रुपला एक ग्लोबल बिझनेस ग्रुप बनवलं आहे. ते टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, ताज हॉटेल्स आणि एअर इंडियाचे मालक आहेत आणि भारतातील स्टारबक्स ड्झणद.ज आणि एअरबसचे बिझनेस पार्टनर आहेत.

### मुंबईचा गड जिंकण्यासाठी भाजपसाठी येणार उत्तर प्रदेशातून कुमक! आमदार, नेते ठाण मांडणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून राजकीय घडामोडींना वेग आला आहे. प्रत्येक राजकीय पक्ष विभागनिहाय रणनीति आखत आहे. मुंबईतील विधानसभेच्या ३६ जागा जिंकण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. मुंबईतील परप्रांतीय टक्का लक्षात घेता भाजपने तशी रणनीति आखली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. भाजप मुंबईतील प्रचारात उत्तर प्रदेशातील नेते, आमदारांना उतरवणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. गुजरातचे मुख्यमंत्री, आमदार हे गुजराती बहुल भागात प्रचार करणार आहेत.

मुंबईसह मुंबई महानगर भागात मराठी भाषिकांसह हिंदी भाषिकांची संख्या लक्षणीय झाली आहे. अनेक विधानसभा मतदारसंघातील जय-पराजयाचं पारडं फिरवण्याइतपत हिंदी भाषिक मतदारांची संख्या झाली आहे. मुंबईतील ३६ मतदारसंघातील काही ठिकाणी विजयी आमदार कोण असेल हे ठरवण्याइतपत मतदान गैरमराठी भाषिकांकडे असल्याचे सांगण्यात येते.

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईतील ३६ जागांसाठी भाजपने कंबर कसली आहे. उत्तर प्रदेशातील काही नेते आणि आमदारांना मुंबईत तळ ठोकण्याचे आदेश पक्ष नेतृत्त्वाकडून देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. मुंबईतील उत्तर भारतीयांची संख्या अधिक असलेल्या भागात बैठका आणि सभा घेण्याचे निर्देश या उत्तर भारतातील नेत्यांना देण्यात आले आहेत. या नेत्यांना विधानसभा निवडणुकीपर्यंत मुंबईतच राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रत्येक नेता, आमदाराकडे एका विधानसभेच्या जागेची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती आहे.

गोव्याच्या मंत्र्यांकडे कोकणची जबाबदारीष्ठ

दरम्यान, भाजपने गोव्याचे मंत्री आणि आमदार हे महाराष्ट्रातील कोकण भागातील प्रचारात सक्रिय राहणार आहेत. कोकणलगतच्या भागात हे मंत्री आमदार महायुतीचा प्रचार करणार आहेत. तर, गुजरातचे मुख्यमंत्री, आमदार आणि भाजपचे नेते हे गुजराती भाषिकांची सर्वाधिक संख्या असलेल्या भागात प्रचार करणार आहेत.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणुका-२०२४; दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांना ‘सक्षम ॲप’ ठरणार मदतगार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : आगामी विधानसभा निवडणुकीत दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना सुलभ रीतीने मतदान करण्यास मदत व्हावी, यासाठी निवडणूक आयोगाने सक्षम नावाचे मोबाईल प तयार केले आहे. या पवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मुलभुत सुविधा उपलब्ध करुन दिले आहे. या सुविधेचा सर्व पीडब्ल्यूडी(पर्सनल व्हीथ डिसबेलिटी) मतदारांनी आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून मतदारांसाठी दिलेला सोयी सुविधा प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




पीडब्ल्यूडी (पर्सनल व्हीथ डिसबेलिटी) मतदारांकरिता आयोगाने तयार केलेले सक्षम पवर विविध सोयी सुविधा देण्यात येत आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम प्रत्येक पीडब्ल्यूडी मतदाराने सक्षम प आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून घ्यावा. निवडणूक संदर्भात सेवा घेण्याकरीता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांना त्यांचे नाव पत्ता आणि मोबाईल क्रमांक इत्यादी माहिती पमध्ये भरावी. दिव्यांग वयोवृद्ध मतदारांना या सक्षम पद्वारे मतदानासाठी लागणाऱ्या सहायतेची मागणी नोंदविता येईल. त्याद्वारे मतदार संघातील दिव्यांग वयोवृद्ध मतदानाचे मतदार संघ व स्थाननिश्रिचती यंत्रणेला करणे शक्य होईल. पद्वारे नोंदणी झाल्यानंतर पीडब्ल्यूडी मतदारांना ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हील चेअर, सहाय्यक मदतनीस इत्यादी प्रकारची सुविधा या पच्या माध्यमातून पीडब्ल्यूडी मतदार मिळवू शकतो.

सक्षम पवर अनेक वैशिष्ट्ये प्रदान करते. दृष्टीहीन असलेल्या पीडब्ल्यूडीसाठी आवाज प्रदान करते. श्रवण अक्षम असलेल्या पीडब्ल्यूडीसाठी प- टेक्स्ट-टु-स्पीच प्रदान करते. पमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे पीडब्ल्यूडीसाठी वापरणे सोपे होते. पमध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्यामध्ये मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र उपलब्ध प्रवेश योग्यता वैशिष्ट्ये आणि मतदान अधिकाऱ्यांच्या संपर्क तपशिलांचा समावेश आहे. पीडब्ल्यूडीला निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतांना येणाऱ्या कोणत्याही समस्याबद्दल पवर तक्रारी नोंदविता येते.

पीडब्ल्यूडीसाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सक्षम प हे महत्वाचे असून वापरण्यास सोपा आहे. ज्यामुळे पीडब्ल्यूडीला मतदान करण्यासाठी नोंदणी करणे, त्यांचे मतदान केंद्र शोधणे आणि त्यांचे मत देणे सोपे होते. जिल्ह्यातील सर्व पीडब्ल्यूडी मतदारांनी सक्षम प डाऊनलोड करून विविध सुविधेचा लाभ घ्यावा.

## ११ वर्षांपूर्वी सलमान खान करणार होता ‘लॉरेन्स’ सोबत चित्रपट, पण अक्षय कुमारने मारली बाजी!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : २००७ मध्ये एक चित्रपट आला होता, त्याचे नाव होते- मुनी. या हॉरर कॉमेडी चित्रपटाला लोकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. बऱ्याच वर्षांनंतर दिग्दर्शकाने २०११ मध्ये त्याचा सिक्वेल आणण्याची घोषणा केली. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि निर्मिती राघव लॉरेन्सने केले. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर भरपूर कमाई केली, त्यानंतर अनेक बातम्यांमध्ये म्हटले होते की, लोकप्रिय हॉरर चित्रपट ‘कंचना’च्या हिंदी रिमेकमध्ये सलमान खान दिसणार आहे. हा प्लानिंग तो त्याचा भाऊ सोहेल खानसोबत करत होता. सलमान खान आणि राघव लॉरेन्स पहिल्यांदाच एकत्र काम करणार होते.

‘कंचना’चा दिग्दर्शक राघव लॉरेन्स याचा हिंदी रिमेक बनवण्यास इच्छुक असल्याचे कळले, तेव्हाच या संपूर्ण प्रकरणाला सुरुवात झाली. सलमान खान आणि लॉरेन्सने या मोठ्या प्रोजेक्टसाठी एकत्र येण्याची योजना आखली, पण शेवटी अक्षय कुमारने बाजी मारली.

‘कांचना’चा हिंदी रिमेक बनवण्याची चर्चा होती, मात्र तो पूर्ण होऊ शकला नाही. यानंतर सलमान खानने चित्रपटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तो डूकोडूच्या हिंदी रिमेकमध्ये काम करणार असल्याचे समोर आले. पण गोष्टी का चुकल्या हे कोणालाच कळले नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, राघव लॉरेन्स ‘कंचना’चा हिंदी रिमेक बनवण्यास उत्सुक होता. दुसरीकडे सलमान खानला त्याचा भाऊ सोहेलसोबत या चित्रपटात काम करायचे होते. अशा परिस्थितीत सोहेलला चित्रपट दिग्दर्शित करायचा होता, ज्यासाठी लॉरेन्स तयार नव्हता. त्याला हिंदी रिमेकही बनवायचा होता, तो होऊ शकला नाही आणि त्यामुळे प्रकरण अडकले.

टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तातून समोर आले आहे की, वन मोशन पिक्चर्सचे सल्लागार विक्रम सिंग यांना सलमान खानला चित्रपटात पाहायचे होते. त्यामुळेच अरबाज खानला ‘कंचना’ चित्रपट दाखवण्यात आला. यावेळी सोहेल खानही तेथे उपस्थित होता. पण शेवटी सलमान खानसोबत हा पिक्चर होऊ शकला नाही. बऱ्याच वर्षांनी म्हणजेच २०२० मध्ये ‘कांचना’चा हिंदी रिमेक बनला. या चित्रपटाचे नाव होते ‘लक्ष्मी बॉम्ब’. अक्षय कुमार मुख्य भूमिकेत होता, ज्याचे दिग्दर्शन आणि निर्मिती राघव लॉरेन्सने केली होती. पण कोविडमुळे तो चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले नाही आणि ओटीटीवर आणावा लागला.

## विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; ८ लक्ष २२ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची पुर्वतयारी म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्यनिर्मीती, वाहतुक व विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. मोहिमेंतर्गत गेल्या १५ दिवसात अवैध मद्यनिर्मिती व विक्री प्रकरणी ७० गुन्हे दाखल केले असून ७७ जणांवर अटकेची कारवाई करण्यात आली आहे. कारवाईमध्ये दोन वाहने, ६९५ लिटर हातभट्टी दारु, २८७ लिटर देशी दारु, १७ लिटर विदेशी दारु, १२ हजार ४२३ लिटर रसायन तर ५ लिटर बिअर जप्त करण्यात आले आहे. जप्त झालेला एकूण मुद्देमालाची किंमत ८ लक्ष २२ हजार ४१५ रुपये आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी दिली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. नवलकर यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात कार्यरत विविध अनुज्ञप्त्यांच्या व्यवहारावर देखरेख तसेच नियंत्रणासाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत केली आहे. तसेच मध्यप्रदेश राज्याच्या सिमावर्ती भागात तपासणी नाके उभारुन सदर नाक्यावर परराज्यातून येणाऱ्या अवैध मद्य वाहतुकीवर अंकुश ठेवण्यात येत आहे. चार निरीक्षकांच्या नियंत्रणाखाली चार पथकांची नेमणुक केली आहे. त्यांच्या मदतीसाठी इतर नऊ अधिकारी नेमलेले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, राज्य उत्पादन शुल्काचे विभागीय उपआयुक्त अर्जुन ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात येत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. १ ते १५ ऑक्टोबर २०२४ दरम्यान संपूर्ण जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये एकुण ७० गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली असुन त्यामध्ये ६९ वारंट गुन्ह्यांसह दोन वाहने जप्त करण्यात आली आहे. जप्त केलेला मुद्देमालाची किंमत ८ लक्ष २२ हजार ४१५ रुपयांचा आहे. तसेच बुलढाणा जिल्ह्यातील किरकोळ व ठोक विक्री मद्य अनुज्ञप्तीधारक यांच्या अनुज्ञप्तीमध्ये जर बनावट मद्य आढळुन आले आहे, अशावर अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करुन त्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात आली आहे.

अवैध मद्य विक्रेते, वाहतुक व विक्री करणाऱ्यावर तसेच हॉटेल्स, ढाब्यांची तपासणी करुन ढाबा चालक, मालकांसह त्याठिकाणी मद्य सेवन करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. अनियमीतता आढळून येणाऱ्या परवानाधारक मद्यविक्री दुकानदारांवरही कारवाई सुरु आहे. नागरीकांनी अवैधरित्या मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स ढाब्यावर जाऊन मद्य सेवन करु नये, असे आवाहन करण्यात येत आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्याबाबत, अवैध मद्यनिर्मीती वाहतुकीबाबत माहीती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती द्यावी.

## विधानसभा निवडणूक तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

### जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांची घेतली बैठक

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून जिल्हा प्रशासन देखील निवडणुकीच्या तयारीला लागले आहे. ही निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी विविध कामांसाठी जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून त्यांच्या कामाचा सोमवारी त्यांनी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर पोलिस अधीक्षक बि.बि.महामुनी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार यांच्यासह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी पोस्टल बॅलेट, ईव्हीएम वितरण व्यवस्था कार्यान्वित करावी. कंट्रोल रुम, सर्व हेल्पलाईन क्रमांक, भरारी पथके, स्थिर संनियंत्रण पथके, पोलीस यंत्रणा कार्यान्वित करावीत, माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती, माध्यम कक्ष कार्यान्वित करावे. निरीक्षक





(ऑब्झर्वर) यांच्यासाठी नेमण्यात आलेल्या संपर्क अधिकाऱ्यांनी नियोजन करावे आदी सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

कमी मतदान झालेल्या केंद्रांवर मतदानाचा टक्का वाढवा

लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील ज्या मतदान केंद्रांवर कमी मतदान झाले आहे. त्या मतदान केंद्रांवर मतदानाचा टक्का वाढला पाहिजेत. मतदान वाढविण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. मतदान केंद्रांवर सोयीसुविधांसह आरोग्य सेवा तयार ठेवाव्यात. दिव्यांग व वृद्धांसाठी मतदान करण्यासाठी सुविधा उपलब्ध कराव्यात. मतदान केंद्रांवर स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रतिक्षा कक्ष, बिछायत आदी व्यवस्था संबंधित यंत्रणेने करावी. एकाच ठिकाणी चारहून अधिक मतदान केंद्र असतील अशा केंद्रांवर म्ब्यूलन्स तयार ठेवावी. मतदानाची टक्केवारी वाढेल यादृष्टीने विशेष लक्ष्य ठेवून काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी नोडल अधिकाऱ्यांना दिल्या.